सुसंस्कृत प्रतिभावंत नेता यशवंतराव चव्हाण

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांचा आज १२ मार्च जन्मदिवस. सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे (ता.कराड) या लहानशा गावी एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेले यशवंतराव यांचे उच्च शिक्षण पुणे येथे झाले. बालपणीच पितृछत्र हरपले नंतर आई विठाबाई यांनी कष्ट करून यशवंतरावांना शिक्षण शिकवले. मुलाने खूप शिकावे ही त्यांचे आईची इच्छा होती.

लहानपणी आषाढी एकादशीला त्यांची आई दरवर्षी त्यांना बोट धरून पंढरपुर ला पांडुरंगा चे दर्शनाला नेऊन विठ्ठलाला एकच मागणे घालायची, हे विठ्ठला माझा यशवंत मोठा होऊ दे मात्र त्याला महाराष्ट्राचे गर्दीत हरवू देऊ नको. हाच यशवंत पुढे मोठा होऊन महाराष्ट्राचा 'यशवंतराव' झाला शालेय जीवनात वक्तृत्व स्पर्धेची आवड असलेले यशवंतराव यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, लोकमान्य टिळक, ना. गोखले यांची भाषणे ऐकून चर्चेदरम्यान यशवंतरावांना त्या वयातच वैचारिक , साहित्यिक पुस्तकांची आवड निर्माण झाली.

त्यांच्यावर महात्मा गांधी व पं. नेहरू यांच्या विचारांचा प्रभाव पडला. त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत सत्याग्रहात भाग घेतला म्हणून त्यांना अठरा महिन्यांची शिक्षा झाली. ते येरवडा तुरुंगात असतानाच एस.एम. जोशी यांच्यासारखे विचारवंताचे सानिध्य लाभले. कोल्हापुरातील राजाराम महाविद्यालयामध्ये असताना त्यांना ना.सी. फडके यांच्यासारखे नामवंत साहित्यिक प्राध्यापक लाभले. त्यांनी एल.एल. बी. ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर १९४२ मध्ये स्वातंत्र्यलढ्यात भूमिगत होऊन कार्य केले.

त्यांना संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेपूर्वी कठोर टीकेला तोंड द्यावे लागले. स्व भाऊसाहेब हिरे व यशवंतराव चव्हाण ह्यांचे मुख्यमंत्री पदांचे राजकीय चढाओढीत अखेर नेहरूजींनी संयुक्त महाराष्ट्राचा मंगलकलश त्यांच्या हातात ठेवला. द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी १ नोव्हेंबर १९५६ रोजी सूत्रे हाती घेतली. १९६० साली महाराष्ट्र राज्य स्थापन झाले व त्याचे ते पहिले मुख्यमंत्री निवडले गेले.

भारत -चीन युद्धाचे वेळी देश संकटात असताना पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांनी त्यांना केंद्रीय सरकार मध्ये शामिल करून त्यांचेवर संरक्षण मंत्रालयाची जबाबदारी सोपवली त्यावेळी 'महाराष्ट्राचा सह्यांद्री ' हिमालयाचे रक्षणासाठी धाऊन गेला अशा गर्जनेत त्यांचा लौकिक अनेक नामवंतानी व अग्रणी वृतपत्रांनी मोठ मोठे संपादकीय अग्रलेख लिहुन केला. १९६२-६६ या काळात ते भारताचे संरक्षणमंत्री होते नंतर गृहमंत्री, अर्थमंत्री आणि १९७४ पासून परराष्ट्रमंत्री व उप पंतप्रधान बनले.पंडित जवाहरलाल नेहरूंच्या आचारविचारांचा त्यांच्यावर खोल ठसा होता. यशवंतराव ब्राह्मण ब्राह्मणेतर चळवळींपासून अलिप्त राहिले. त्यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य दिले.

एक आदर्श राजकारणी,प्रतिभावंत लेखक, साहीत्य व शास्त्रीय गायनाची आवड असणारे, आपल्या ओघवत्या वक्तृत्वाने उपस्थितांचे मने जिकणारे ऊतम वक्ता, कार्यक्षम मंत्री, यशस्वी संयमी संसदपटू आणि जनसामान्यात ज्यांनी स्थान रुजविले असा सुसंस्कृत व उदारमतवादी नेता असे यशवंतरावांचे थोडक्यात वर्णन करता येईल. चाळीस वर्षांपेक्षा अधिक काळ ते राजकारणात होते.

यशवंतरावांवर फुले, शाहू महाराज यांच्या समाज प्रबोधनाचा प्रभाव होता. म्हणून त्यांनी हे राज्य 'मराठ्याचे नाही तर मराठी माणसाचे आहे ' हे स्पष्टपणे सांगितले. महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर त्यांनी अनेक सहकारी साखर कारखानदारी, जिल्हा परिषदा, साहित्य संस्कृति मंडळ वगैरे सारख्या अनेक उपक्रमांना चालना दिली. तसेच कोयना, उजनी सारखे मोठे पाटबंधारे योजना सारखी विकासात्मक कामे निर्माण करून राज्य सुखलाम होईल अशी दिव्यदृष्टी डोळ्यासमोर ठेवली.

यशवंतरावांना विचारवंत, साहित्यिक, सर्व क्षेत्रांतील कलाकार यांच्याबद्दल विशेष आदर होता. ज्ञानपीठ पारितोषिक विजेते साहित्यिक वि. स. खांडेकर त्यांचे सत्कार प्रसंगी म्हणाले होते यशवंतराव राजकारणात नसते तर ते उत्तम साहित्यिक झाले असते .प्रसिद्ध साहित्यिक ना.सी. फडके यांनी त्यांचे 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रामधील लालित्यपूर्ण भाषेबद्दल यशवंतरावांची मुक्त कंठाने प्रशंसा केली आहे. गो.नि. तळवलकर यांनी 'सुसंस्कारित मराठी नेता' या शब्दांत यशवंतरावांचा गौरव केला होता. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींपासून ते ना.धों. महानोरां पर्यंतच्या विचारवंतांशी व साहित्यिकांशी त्यांचे चांगले संबंध होते. कृष्णाकाठ, ऋणानुबंध आदी पुस्तकांतून त्यांच्यातील लेखकही दिसतो. साहीत्या सोबतच यशवंतरावांना शास्त्रीय संगीताची पण उत्तम जाण होती. शास्त्रीय गायक भीमसेन जोशी व इतर महान गायकांच्या मैफलीमध्ये ते आनंदाने सहभागी होत.

महाराष्ट्राचे माजी मुख्य सचिव श्री शरद उपासनी, केंद्रीय गृह सचिव डॉ. माधव गोडबोले आणि केंद्रीय अर्थसचिव श्री शरद काळे या माजी सनदी अधिकाऱ्यांनी यशवंतरावांच्या कार्याचा उरक, सचिवांशी चर्चा करून निर्णय घेण्याची पद्धत,कार्य शैली ,वक्तशीरपणा, टापटीप, व्यासंग, इंग्रजी मराठी हिंदी भाषांवरील प्रभुत्व इत्यादी बाबत भरभरून लिहिले आहे.

त्याकाळी संसदेत इंग्रजी-हिंदीवर प्रभुत्व असणारे हिरेन मुखर्जी,अटल बिहारी वाजपेयी, नाथ पै, एस.एम. जोशी, डांगे, मधु लिमये, राम मनोहर लोहिया यांच्यासारखे विविध पक्षांचे दिग्गज नेते विरोधी पक्षांत होते. यशवंतराव त्यांचे वर संसदेत होण्यारे टिका टिपणीमुळे कधीच उद्विग्न न होता संयमी असत.त्यांचा स्वभाव विरोधकांना सन्मानाने वागवण्याचा होता.

अमरावतीचे नेहरू मैदानावर मला त्यांना प्रत्यक्ष पाहण्याचा व त्यांचे अभ्यासपूर्ण भाषण ऐकण्याचा योग लाभला. १९८२ मध्ये शरद पवार यांनी तत्कालीन मुख्यमंत्री बॅ.अंतुले यांचे विरोधात काढलेल्या शेतकरी दिंडीचे वेळी त्यांना अमरावती जवळील पोहरा येथे पोलिसांकडून अटक झाली व त्यांना एस.टी.बस मध्ये नेत असताना ते पुस्तक वाचत होते. पत्रकारांनी त्यांना गाठून एस टी मध्ये बसण्याची पहिलीच वेळ असेल असा प्रश्न विचारला असता त्यांनी नाही हि दुसरी वेळ, एस टी चे उदघाटनवेळी एकदा बसलो होतो. नंतर त्यांना विचारले आपण इतक्या व्यस्त जीवनात साहित्यिक वाचन केव्हा करता त्यावर जेव्हा कधी मी प्रवासात असतो तेव्हा साहित्यिक पुस्तकेच वाचत असतो असा हजरजबाबीपणा गुणासह त्यांच्यातील त्यांचे अभ्यासु साहित्य प्रेम दिसुन आले.

आजच्या काळात असे सुसंस्कृत व साहित्यीक अभ्यासु राजकीय व्यक्ती दृष्टीपंथास येणे दुर्मिळ झाले आहे. नविन राजकीय पिढीने त्यांचे पासून बोध घ्यावा. अशा या थोर पुरूषाचे आजारामुळे दि.२५ नोव्हेंबर १९८४ ला निधन झाले .मृत्यू पश्चात त्यांचे बॅक खात्यात फक्त रू ३६०० इतकी लहान रक्कम त्यांची आयुष्याची शिल्लक संपत्ती मिळकत फक्त आढळून आली. त्यांनी त्यांच्या मागे संपत्ती ठेवली नाही. पण एक गरीब शेतकऱ्याचा मुलगा स्वतःच्या बुद्धीच्या, कर्तृत्वाच्या बळावर लोकमान्यांच्या नंतरचा महान नेता बनला हे महाराष्ट्र कधीही विसरणार नाही असे मत सुरेश द्वादशीवार यांनी एकदा नोंदवले आहे. आयुष्याचे शेवटचे काळात आजारी पडून यशवंतराव चव्हाण यांनी २५ नोव्हेंबर १९८४ रोजी जगाचा निरोप घेतला अशा या सुसंस्कृत ,साहित्यिक, व उदारमतवादी राजकीय प्रतिभावंतास आज त्यांचे जन्मदिनी विनम्र अभिवादन.

● वा. पां. जाधव
अमरावती
मो. ९४२२८५६५७२

नगरोत्थान महाभियानांतर्गत अमरावती शहराच्या रस्ते विकासाच्या १५० कोटींच्या प्रकल्पाला शासनाची मंजुरी

नागरी भागात पायाभूत सुविधा व त्यांचा दर्जा वाढविण्याला प्राधान्य : आ.सुलभा खोडके

अमरावती दि. १२ : अमरावती शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता तसेच शहरातील वर्दळीच्या रस्त्यांवरून दररोज वाढती वाहनांची गर्दी पाहता शहरात रस्ते विकासाला प्राधान्य देत आ. सौ.सुलभाताई खोडके यांच्या प्रयत्नाने शहरात सुरक्षित व अपघात विरहित वाहतुकीच्या सोयी सुविधा निर्माण केल्या जात आहे. त्या दृष्टिकोनातून काँक्रीट रस्त्यांचे विस्तीर्ण जाळे सर्वदूर पसरत असल्याने शहरातील अंतर्गत रस्ते , प्रमुख मार्ग व जिल्हा प्रमुख मार्ग हे अत्याधुनिक व सुसज्य अशा काँक्रिटीकारणानें कात टाकत असल्याने रस्त्यांना नवी चकाकी आली आहे. याच ;शुंखलेत नगरोत्थान अभियान अंतर्गत अमरावती महानगर पालिका रस्ते विकासाचा १५० कोटींचा प्रकल्प मंजूर करण्यात यावा यासाठी अमरावतीच्या आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केला. आगामी लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहिते पूर्वी या प्रकल्पाला मंजुरी मिळण्याला घेऊन आमदार महोदयांनी शासनाकडे पाठपुरावा केला असता , फलश्रुती म्हून शासनाच्या नगर विकास विभागाच्या वतीने नगरोत्थान महाभियानांतर्गत अमरावती शहराच्या रस्ते विकासाच्या १५० कोटींच्या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली. या संदर्भात नगर विकास विभागाने शासन निर्णय जारी करून कामांच्या निविदा प्रक्रिया व कार्यादेश व कार्यान्वयन आदी संदर्भातील कार्यवाही जलद गतीने पूर्ण करण्या संदर्भात निर्देशित केले आहे.

अमरावती महानगर पालिका रस्ते विकास प्रकल्पांतर्गत नवसारी पासून ते पाठ्यपुस्तक ते राममोहन नगर व नवसारी पासून ते पंजाबराव देशमुख को- ऑपरेटीव्ह बँक ते वली चौक पर्यंतचा रस्ता, नवसारी अम्मन बोअरवेल पासून ते कठोरा नाका रस्ता , शेंगाव नाका रहाटगांव रोड पासून ते सात बंगला ते पुलापर्यंतचा रस्ता , गाडगे नगर ते तपोवन पासून ते सात बंगला व मालू ले आऊट पर्यंतचा रस्ता, तसेच गाडगेनगर -तपोवन पासून राजमाता कॉलनी ते आयटीआय कॉलेज रोड पर्यंतचा रस्ता , शेंगाव नाका रहांटगांव कडून जावरकर लॉन रिंग रोड पर्यंतचा रास्ता , या रस्त्यांचे काँक्रीटीकरण व दोन्ही बाजूंना नाली व पेव्हिंग ब्लॉक बसविणे आदी कामे करण्यात येणार आहे. या कामांमध्ये शासनाच्या वित्तीय आकृतीबंधानुसार ७० टक्के वाटा शासन उचलणार असून अमरावती महानगर पालिका ३० टक्के भार उचलणार आहे.

नागरी भागात मूलभूत पायाभूत सुविधा वाढविण्यासाठी व त्यांचा दर्जा वाढविण्याकरिता नगरोत्थान अभियानातंर्गत अमरावती महानगर पालिका रस्ते विकास योजनेचा प्रकल्प राबवून त्याला मंजुरी व निधी उपलब्ध करण्याला घेऊन आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा चालविला . दरम्यान या प्रकल्पाच्या तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मंजुरी बाबतही शासन -प्रशासनाशी समन्वय राखून सर्व कार्यवाही करीत या प्रकल्पाला मंजुरी देण्याची मागणी शासनाकडे लावून धरली. यासाठी गेल्या २४ जानेवारी २०२४ रोजी शासनाला पत्राद्वारे अवगत करीत विनंती करण्यात आली असता लगेच दिनांक २ फेब्रुवारी २०२४ रोजी मुंबई येथे झालेल्या राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समितीच्या बैठकीत सदर प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी देण्याबाबतची शिफारस शासनाकडे करण्यात आली.

अशातच शासनाच्या नगर विकास विभागाने नगरोत्थान महाभियानांतर्गत अमरावती शहराच्या रस्ते विकासाच्या १५० कोटींच्या प्रकल्पाला मंजुरी प्रदान केली आहे. त्यामुळे अमरावती शहरात नागरी पायाभूत सुविधांच्या विकासात आणखीन भर पडली असून शाश्वत विकासाला बळकटी मिळाली आहे. याबद्दल आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांचे आभार मानीत अभिनंदन केले आहे.

जगदंब महाविद्यालय येथे एक दिवसीय कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात संपन्न

अचलपूर दि. १२ : जगदंब महाविद्यालय अचलपूर, येथे ९ मार्च २०२४ रोजी जागतिक महिला दिनानिमित्य महिला सक्षमीकरण कक्षाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकसित व्हावे व त्यांना याद्वारे रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने 'बांबू पासून वस्तु निर्मिती व मार्केटिंग' या विषयावर एक दिवसीय कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

उद्घाटन सत्राचे अध्यक्ष मा. श्री. रमाकांतजी शेरकार, अध्यक्ष, श्री. जगदंब विणकर शिक्षण संस्था, अचलपूर शहर हे होते तर उद्घघाटक व प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. सहदेव शनवारे,संचालक, भारतीय ग्रामीण आदिवासी विकास संस्था, बांबू क्राफ्ट क्लस्टर, वेणुग्राम, लवादा, ता. धारणी, जि. अमरावती हे उपस्थित होते.

'बांबुचे महत्व व रोजगाराचे साधन' या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर मार्गदर्शन करतांना शनवारे यांनी असे प्रतिपादन केले की, बांबू ही भारतीय वातावरणामधे सहज लागवड होऊ शकणारी आणि चाळीस वर्षांच्या दीर्घ कालावधी पर्यंत उत्पादन देणारी वनस्पती आहे.उद्योगातील वस्तू तुलनात्मक दृष्ट्या महाग असतात ऐवढेच नव्हे तर ह्या वस्तू निर्माण करतांना पर्यावरणाची बरींच हानी होत असून वापरानंतर बराच कचराही या वस्तूंचा होतो.अशावेळी आपण बांबू पासून कमी खर्चात आणि कमी वेळेत सुंदर, टिकावू अशा पर्यावरण पूरक वस्तू बनवू शकतो.महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधे बांबू पासून वस्तू निर्मितीच्या कौशल्य विकासातून मोठ्या प्रमाणात रोजगार व स्वयंरोजगार निर्माण केला जाऊ शकतो.

दुसऱ्या सत्रामध्ये मध्ये मा. श्री. लोकेश बांधिया, बांबू क्राफ्ट प्रशिक्षक, भारतीय ग्रामीण आदिवासी विकास संस्था, बांबू क्राफ्ट क्लस्टर, वेणुग्राम, लवादा यांनी बांबु पासून विविध वस्तूची निर्मिती कशी करायची याबाबत प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. यामध्ये प्रामुख्याने शोभेच्या वस्तु, ज्वेलरी दैनंदिन उपयोगाच्या उपयुक्त वस्तूंचा समावेश होता.

समारोपीय सत्राच्या अध्यक्ष मा. डॉ. प्रा. बी. जी. वानखडे , प्राचार्य, जगदंब महाविद्यालय, अचलपूर, ह्या होत्या तर मा. श्री. दिपक सोळंके, डिझाईन डेव्हलपर, भारतीय ग्रामीण आदिवासी विकास संस्था, बांबू क्राफ्ट क्लस्टर, वेणुग्राम, लवादा यांनी 'बांबू पासून डिझाईन निर्मिती व त्यांचे विपणन' या विषयावर मार्गदर्शन करतांना बांबू ही अन्न,औषधी तसेच विविध जीवनोपयुक्त वस्तू निर्मितीचा कच्चा माल म्हणून कामात येतो आणि बदलत्या काळानुसार मानवी जीवनात बांबूचे महत्व सतत वाढत चालले आहे.तसेच या वस्तूंची थेट विदेशात मोठी मागणी असल्याने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मोठा वाव या क्षेत्रात असल्याचे प्रतिपादन केले आहे.प्रातिनिधिक मनोगत दुर्गेश बर्वे व कु. आफीया यांनी व्यक्त केले.कार्यशाळेच्या निमित्ताने जगदंब महाविद्यालयाच्या महिला सक्षमीकरण कक्षाने शब्दांच्या पलीकडले जाऊन स्त्री - पुरूष समानता, रोजगाराभिमुखता, आर्थिक सक्षमता, पर्यावरण पूरकता हि शैक्षणिक मुल्य रूजवीण्याचा प्रयत्न केला आहे.तथा महाविद्यालय सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेले आहे याचे भान ठेवत आदिवासी बांधवांच्या कौशल्यांना वाव देण्याचाही प्रयत्न केला आहे.तसेच लोकल टू व्होकल जाण्याच्या प्रयत्नही केला आहे.

कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे मोठा सहभाग नोंदविला. कार्यशाळेचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन डॉ. के. बी. जोगी यांनी तर सूत्रसंचालन प्रा. टी. के. वाहाने यांनी केले. आयोजनाकरीता महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. बी. जी. वानखडे तसेच महिला सक्षमीकरण कक्ष समन्वयक डॉ. के. बी. जोगी समिती सदस्य प्रा. मोसीम शेख , डॉ.तुलिका खडसे तथा संपूर्ण शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.या प्रसंगी बांबू पासून बनवलेल्या विविध वस्तूंच्या प्रदर्शनीचे आयोजनही करण्यात आले होते. प्रदर्शनीला विद्यार्थी तथा प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात मतदार जनजागृती अभियान

अमरावती दि. १२ : शासनाच्या 'मेरा पहिला वोट देश के लिये अभियाना'अंतर्गत स्थानिक अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना पथक आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने मतदार जनजागृती अभियान सप्ताह नुकताच संपन्न झाला.याप्रसंगी विविध उपक्रम राबविण्यात आले.

भारतातील लोकशाही यशस्वी होण्याच्या दृष्टीने निःपक्षपाती निवडणुकीचे अनन्य साधारण महत्व असून त्यासाठी सर्व नागरिकांनी स्वेच्छेने निवडणूक प्रक्रियेत सहभागी होणे आणि जबाबदारीने आपला मतदानाचा अधिकार बजावणे अनिवार्य आहे. त्यासाठी मतदार नोंदणी आणि जनजागृती करण्यासाठी शासनाने रासेयो पथकाचे वतीने राज्यभर 'मेरा पहला वोट देश के लिये 'हे अभियान राबविले जात असून त्या अन्तर्गत महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाने पार्वती नगर परिसरात मतदार जनजागृती रॅली काढून मतदार वर्गाचे प्रबोधन पथनाट्य सादर करून केले. याप्रसंगी रासेयो स्वयंसेवकांनी प्रत्यक्ष मतदारांशी संवाद साधून त्यांच्या मतदार नोंदणी तील अडचणी जाणून घेतल्या.

मतदार जनजागृती अभियान सप्ताह अन्तर्गत रासेयो पथकाने महाविद्यालयात मतदाता शपथ चे आयोजन केले. यावेळी आयोजीत कार्यक्रमात प्राचार्य डॉ मीनल ठाकरे भोंडे यांनी स्वयंसेवक व विद्यार्थ्यांचे उद्बोधन करताना समाजात ही जनजागृती करीत असताना स्वतः आणि आपल्या कुटुंबापासून त्याची सुरुवात करण्याचे आवाहन केले.मतदाता शपथ घेऊन न थांबता त्याची अंमलबजावणी शेवटच्या नागरिकांपर्यंत कशी पोहचून तेही मतदान प्रक्रियेत सहभागी होतील यांचे उत्तरदायित्व आपणा सर्वांवर असल्याचे प्रतिपादन केले. उपस्थितांचे आभार प्रा डॉ सुशांत ठोके रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी तर आयोजन महिला रासेयो कार्यक्रम प्रा.विद्या अंभोरे यांनी केले.कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व स्वयंसेवक विध्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

आज वणीत सुनील यावलीकर, वैखरी यावलीकर यांच्या दृश्यकला कार्यशाळेचे आयोजन

वणी दि. १२ : स्थानिक शिक्षण प्रसारक मंडळ संचालित लोकमान्य टिळक महाविद्यालयातील 'आराधना' वार्षिकांक समितीच्या वतीने 'दृश्यांतर' या दृश्यकला कार्यशाळेचे आयोजन बुधवार दि.१३ मार्च रोजी आयोजन केले आहे. ख्यातनाम कलसमीक्षक व चित्रकार सुनील यावलीकर आणि छायाचित्रकार वैखरी यावलीकर हे या कार्यशाळेत युवा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

सकाळी साडेअकरा वाजता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विजयराव मुकेवार यांच्या अध्यक्षतेत शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नरेंद्र बरडिया यांचे हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन होईल. यावेळी सचिव सुभाषराव देशमुख, सहसचिव अशोक सोनटक्के, सदस्य सर्वश्री नरेंद्र ठाकरे, उमापती कुचनकार, ओमप्रकाश चचडा,नरेश मुणोत, सुरेश शुक्ल,अनिल जयस्वाल, विनायकराव तत्त्वादी, प्राचार्य डॉ. प्रसाद खानझोडे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या कार्यशाळेत सुनील यावलीकर रेखाटने, जलरंगातील चित्र आणि तैलचित्रे यांविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत तर वैखरी यावलीकर छायाचित्रण या दृश्यकलेविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी 'आराधना' वार्षिकांक समितीचे सदस्य डॉ.मानस कुमार गुप्ता, डॉ. स्वानंद पुंड, डॉ. मनोज जंत्रे, प्रा.किशन घोगरे, डॉ.अजय राजूरकर यांचेसह प्रा.उमेश व्यास, डॉ. गुलशन कुथे, प्रा. बाळा मालेकर, प्रा.राहुल खोंडे, पंकज सोनटक्के, नितेश चामाटे हे प्रयत्न करीत आहेत.दृश्यकलेत रुची असणाऱ्या युवा विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभागी व्हावे असे आवाहन 'आराधना' वार्षिकांक समितीचे समन्वयक डॉ. अजय देशपांडे व प्राचार्य डॉ. प्रसाद खानझोडे यांनी केले आहे.

स्त्रियांशिवाय कुटुंब नाही : डॉ. रामदास पंत उमक

अमरावती दि. १२ : जागतिक महिला दिना निमित्त महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ अमरावती गटाच्या वतीने स्त्री भ्रूण हत्या या विषयावर परिसंवाद , उमक नर्सिंग स्कूल बडनेरा येथे सहाय्यक कल्याण आयुक्त नंदलाल राठोड व कामगार कल्याण अधिकारी प्रतिभा भाकरे यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आले होते.डॉक्टर रामदास पंत उमक यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख पाहुणे म्हणून, अध्यक्ष विद्युत वितरण कर्मचारी सोसायटी ,रामकृष्ण चिखलकर, तसेच, कार्याध्यक्ष कंत्राटी कामगार सेना अमरावती मोहम्मद वासिक, यांच्या उपस्थितीत स्त्रीभ्रूणहत्या परिसंवाद संपन्न झाले. स्त्रिया कुटुंबाकरिता समाजासाठी त्याग करतात . स्त्रियांशिवाय कुटुंब नाही. असे प्रतिपादन परिसंवादाच्या कार्यक्रमात डॉक्टर रामदास पंत उमक यांनी केले.परिसंवादामध्ये प्रमुख वक्ता म्हणून स्त्री रोग तज्ञ डॉक्टर वर्षा उमक, यांनी आपले विचार व्यक्त करताना, लिंग समानता जनजागृती काळाची गरज आहे स्त्रियांनी अधिक सक्षम व जागरूकतेने राहणे आवश्यक आहे.व्यवस्थापक ,उमक नर्सिंग स्कूल बडनेरा सारिका देशमुख यांनी व पाहुण्यांनी या विषयावर मार्गदर्शन केले. सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्र संचालक सचिन खारोडे व संचालन केंद्र संचालक अनिल गायकवाड तर आभार, केंद्र महिला कल्याण सहाय्यीका रंजना परळीकर यांनी केले कार्यक्रमाला अमरदीप काळे कुंदा इटणकर, नर्सिंग स्कूलच्या विद्यार्थिनी, प्रामुख्याने उपस्थित होते.

स्व. मदनगोपाल मुंधडा महाविद्यालय येथे अंतर्गत तक्रार निवारण समितीद्वारा कार्यशाळा संपन्न

चांदूर रेल्वे दि. १२ : स्थानिक स्व. मदनगोपाल मुंधडा महाविद्यालयामध्ये दि. ७ मार्च २०२४ रोजी अंतर्गत तक्रार निवारण समितीद्वारा एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये झजडककायद्याविषयी जागरूकता आणणे हा होता. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयंत कारमोरे होते. कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. अतुल वानखडे महिला महाविद्यालय चांदुर रेल्वे यांचे हस्ते करण्यात आले. विशेष उपस्थिती अँड. सुप्रिया मकेश्वर यांची होती,

विश्वातील महिला विविध क्षेत्रांमध्ये महत्वाचे योगदान करीत आहे त्यांच्या सामाजिक आर्थीक आणि राजकीय समस्यांवर लक्ष देणे गरजेचे आहे परंतु त्याचवेळी आज प्रसारमाध्यमांमूळे मोडकळीस येणारी कुटूंबासंख्या, वाढते वृद्धाश्रम, याचा भारतीय स्त्रीने गांभीयाने विचार करणे गरजेचे आहे असे मत प्रमूख अतिथी तसेच उदघाटक डॉ. अतुल वानखडे यांनी व्यक्त केले. विषेश उपस्थित अँड सुप्रिया मकेश्वर यांनी झजडक कायद्याची रचना, कार्यपद्धती आणि कामाच्या ठिकाणी महिलांना असणाऱ्या सूरिक्षततेसंबंधी माहिती दिली. आपल्या अध्यक्षीय मनोगतातून डॉ. जयंत कारमोरे यांनी नविन पिढीला असलेल्या ज्ञानाचे कौतुक केले पंरतु त्याचवेळी स्त्रीयांनी संविधानात दिलेल्या स्वातंत्र्याचा उपभोग घेतांना समाजव्यवस्था आणि आपल्या पुढील पिढीच्या भविष्याचा विचार करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षा प्रा. डॉ. ज्योती ठाकरे यांनी समितीच्या कामकाजाची माहिती आणि पद्धती विद्यार्थ्यांना समजावून सांगितली.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. पूजा काळबांडे यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. सुषमा मावंडे यांनी केले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी समिती सदस्य डॉ. नितीन जसवंते व श्री. राजेंद्र किन्हीकर यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यशाळेला महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच बहूसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.